ePaper

# धक्कादायक! पुण्यात सात वर्षीय मुलाला शिक्षिकेची बेदम मारहाण!



| वर्ष - 6 | अंक - 159 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- न्यासांच्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी कायमस्वरुपी यंत्रणा हवी!
- 'हाय वैक्युम सक्षन मशीन खरेदीत गडबड घोटाळा!

www.mahaenews.com | रविवार | दिनांक 18 सप्टेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# राष्ट्रवादीच्या शहराध्यक्षांचे 'विमान जमिनीवर'!

## सत्ता जाताच लांडेंची आठवण : फ्लेक्स, बॅनरवर फोटो अखेर झळकले

**| पिंपरी |**

**| महाईन्यूज | प्रतिनिधी|**

**पिंपरी-चिंचवड राष्ट्रवादीतील अंतर्गत वाद संपवून आणि लहान-थोरांना सोबत घेवून पक्ष संघटनेचे गाडा हाकणार... अशी भीष्मप्रतिज्ञा करणारे विद्यमान शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी अखेर आपली चूक सुधारण्याचा समजूतदारपण दाखवला. माजी आमदार विलास लांडे यांना आता पक्षाच्या फ्लेक्स- बॅनरवर सन्मानाचे स्थान मिळाल्याचे पहायला मिळत आहे. ही बाब पक्षाच्या संघटनात्मक बांधणीसाठी सकारात्मक आहे, असा दावा पक्षातील निष्ठावंत कार्यकर्त्यांकडून केला जात आहे.**

राज्यात महाविकास आघाडीची सत्ता आल्यानंतर पिंपरी-चिंचवड राष्ट्रवादीमध्ये संघटनात्मक बदल करण्यात आले. पक्षाच्या पडत्या काळात संजोग वाघेरे-पाटील यांनी एकहाती





धुरा सांभाळली. किंबहुना, भाजपाकडे प्रचंड बहुमत असतानाही २०१७ च्या निवडणुकीत पक्षाचा अजेंडा राबवला. २०१९ मध्ये विधानसभा निवडणुकीत शहरातील ३ पैकी दोन मतदार संघात राष्ट्रवादीला अधिकृत उमेदवारही देता आला नाही. अशा परिस्थितीत वाघेरे-पाटील यांनी राष्ट्रवादीची धुरा सांभाळली.

### बनसोडे, लांडे शहरातील 'किंगमेकर'

पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपाचे दोन आमदार असले तरी, राष्ट्रवादीची ताकदही तुल्यबळ आहे. मात्र, राष्ट्रवादीची ताकद ही गटातटात आणि नव्या- जुन्यांमध्ये विभागली आहे. भाजपातही गट-तट आहेत. मात्र, निवडणुकीला सामोरे जाताना भाजपा एकसंघपणे राष्ट्रवादीला विरोध करताना दिसते. दुसरीकडे, राष्ट्रवादीचे आमदार अण्णा बनसोडे, माजी आमदार विलास लांडे आणि माजी शहराध्यक्ष संजोग वाघेरे-पाटील असे अनुभवी आणि मातब्बर नेते आहेत. त्यांना पक्ष संघटनेत सक्रिय करुन घेणे हीच पक्षाची गरज आहे. पिंपरी मतदार संघात आमदार बनसोडे भाजपाला तगडे आव्हान उभे करु शकतात. तसेच, भोसरी मतदार संघात किमान २० नगरसेवक निवडून आणण्याची क्षमता माजी आमदार विलास लांडे यांच्याकडे निश्चितपणे आहे. संजोग वाघेरे-पाटील यांना मानणारा वर्गही शहरात मोठा आहे. त्यामुळे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी ज्येष्ठांना निर्णय प्रक्रियेत सहभागी करुन घेणे अपेक्षीत आहे. दरम्यान, शिरुर लोकसभा मतदार संघाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या वाढदिवसानिमित्त शहर राष्ट्रवादीचे फ्लेक्स आणि बॅनर उभारले आहेत. त्यामध्ये माजी आमदार विलास लांडे यांचे फोटोही झळकू लागले आहेत. यापूर्वी, जूनमध्ये पक्षाच्या स्थापना दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमांच्या फ्लेक्समधून लांडे यांचे फोटो गायब झाले होते. आता शहरा राष्ट्रवादीने ही चूक सुधारलेली पाहायला मिळते. ही बाब स्वागतार्ह आहे, अशा प्रक्रिया राष्ट्रवादीच्या गोटातून उमटू लागल्या आहेत.

### आक्रमक, हजरजबाबी 'इमेज बिल्डिंग' अट्टाहास नडला...

सुरुवातीच्या काळात नवे- जुने, लहान- थोरांना सोबत घेवून पक्षाची ताकद वाढवणार, असा दावाही गव्हाणे यांनी केला होता. मात्र, महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात भाजपातील नाराजांवर गव्हाणे यांनी अक्षरश: 'सट्टा' लावला. सुमारे २५ ते ३० नाराज नगरसेवक राष्ट्रवादीत येणार, असा दावा केला जात होता. पण, शिवसेनेतील बंडखोरीमुळे महाविकास आघाडी सरकार कोसळले. भाजपा- शिंदे गटाच्या मदतीने सत्तेत आली. या सर्व राजकीय अतीवेगवान घडामोडीत गव्हाणेंकडून नकळत पक्षातील जुने-जाणते दुखावले, ही वस्तुस्थिती आहे. भाजपातील नाराज आणि नवोदितांना सोबत घेत गव्हाणे यांच्याकडून ज्येष्ठ मंडळी राजकीयदृष्टया कॉर्नर होवू लागली, अशी टीका होवू लागली होती. त्यातच शांत, संयमी अशी सकारात्मक ओळख असताना आक्रमक आणि हजरजबाबी... अशी नवी ओळख निर्माण करण्यासाठीचा अवास्तव प्रयत्न राजकीयदृष्टया हिताचा ठरला नाही. पिंपरी विधानसभा मतदार संघाचे आमदार अण्णा बनसोडे, माजी आमदार विलास लांडे, माजी शहराध्यक्ष संजोग वाघेरे अशा ज्येष्ठांना पक्षातील निर्णय प्रक्रियेत समाविष्ट केले जात नाही, असे चित्र निर्माण झाले. यासोबतच "भाजपातील नाराजांना रेड कार्पेट आणि निष्ठावंताच्या हातावर तुरी..." असा संदेश पक्षसंघटनेत गेल्यामुळे गट-तट, मतभिन्नता वाढली. आता महाविकास आघाडीची सत्ता गेल्यामुळे गव्हाणे यांचा आक्रमक वारु शांत झालेला पहायला मिळत आहे. आंदोलन, मोर्चांमधील कृत्रिम रुद्रावतारही मावळला आहे. त्यामुळे सत्ता

# केंद्र सरकारने बेरोजगारीची श्वेतपत्रिका प्रसिद्ध करावी!

## कौस्तुभ नवले : शहर युवक काँग्रेसचे आंदोलन

**| पुणे |**

**| महाईन्यूज | प्रतिनिधी|**

मागील सात वर्षांपासून देशात वाढलेल्या बेरोजगारीची खरी आकडेवारी नागरिकांसमोर आली पाहिजे. यासाठी केंद्र सरकारने उद्योग, श्रम आणि मनुष्यबळ मंत्रालयाच्या फसव्या आकडेवारीवर अवलंबून न राहता "बेरोजगारीची सत्य परिस्थिती देणारी श्वेतपत्रिका" प्रसिद्ध करावी अशी मागणी पिंपरी चिंचवड शहर युवक काँग्रेसचे अध्यक्ष कौस्तुभ नवले यांनी केली.



चिंचवड गावातील चापेकर चौक येथे पिंपरी चिंचवड शहर युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी १७ सप्टेंबर हा दिवस राष्ट्रीय बेरोजगार दिन म्हणून साजरा करीत केंद्र सरकारचा निषेध केला. या आंदोलनात युवक अध्यक्ष कौस्तुभ नवले बोलत होते. यावेळी युवक काँग्रेसचे शहर उपाध्यक्ष चंद्रशेखर जाधव, प्रदेश सरचिटणीस अनिकेत अरकडे, एनएसयूआय प्रदेश उपाध्यक्ष ॲड. उमेश खंदारे, शहर सरचटणीस सौरभ शिंदे, अपूर्वा इंगोले, गौरव चौधरी, चिंचवड विधानसभा अध्यक्ष रोहित शेळके, पिंपरी विधानसभा अध्यक्ष प्रतीक जगताप, जय ठोंबरे, अजित पवार आदींनी केंद्र सरकारचा निषेध करणारे फलक हातात घेऊन घोषणा देत आंदोलन केले.

### युवक काँग्रेसच्यावतीने केंद्र सरकारचा तीव्र निषेध

**यावेळी कौस्तुभ नवले म्हणाले की, दरवर्षी दोन कोटी नवीन रोजगार उपलब्ध करू अशा भूलथापा देऊन सात वर्षांपूर्वी केंद्रात नरेंद्र मोदी यांचे सरकार आले. मागील सात वर्षात रोजगार निर्माण होण्याऐवजी केंद्र सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे आणि ऐनवेळी लादलेल्या नोटाबंदी आणि जीएसटीमुळे कोट्यावधी तरुणांच्या सुरू असणाऱ्या नोकऱ्या गेल्या आहेत. नोटाबंदी आणि जीएसटी ची झळ अजूनही मध्यम लघु उद्योजकांपासून मोठ्या उद्योगांना बसत आहे. मध्यम, लघु उद्योजक, शेतीपूरक व्यवसायाला कर्जातून बाहेर येण्यासाठी आर्थिक सहाय्य देण्याऐवजी पंतप्रधान नरेंद्र मोदी कार्पोरेट कंपन्यांना कर्जमाफी देत आहेत. केंद्र सरकारने सार्वजनिक उद्योगांचे खाजगीकरण करण्याचा नवीन उद्योग सुरू केला आहे. यामुळे नवीन रोजगार निर्मिती होणार नाही तर उलट असणारे रोजगार संपुष्टात येऊन मोठ्या भांडवलदारांचे भले होत आहे. अशा सरकारचा पिंपरी चिंचवड युवक काँग्रेस तीव्र निषेध करीत आहे. यावेळी चंद्रशेखर जाधव म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देशाचे पंतप्रधान नसून फक्त गुजरातचे पंतप्रधान आहेत. त्यांच्या दबावामुळेच महाराष्ट्रात तळेगाव येथे येणारा वेदांता फॉक्सकॉनचा लाखो रोजगार देणारा प्रकल्प गुजरातला गेला आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील तरुणांमध्ये तीव्र असंतोष आहे. यामुळे पुढील काळात महाराष्ट्रातील बेरोजगारीचे प्रमाण आणखी वाढणार आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारचा युवक काँग्रेस तीव्र निषेध करीत आहे.**

## शॉर्ट न्यूज

### शहरभर कोंडी; वाहनचालकांना मनस्ताप



।पुणे। महाईन्यूज ।

शहरभर झालेल्या वाहतूक कोंडीमुळे वाहनचालकांना शनिवारी सायंकाळी मनस्तापाला सामोरे जावे लागले. डेक्कन जिमखाना, कर्वे रस्ता, फर्ग्युसन रस्ता, गणेशखिंड रस्त्यावर कोंडी झाली होती. पाच ते दहा मिनिटांचे अंतर कापण्यासाठी वाहनचालकांना अर्धा ते पाऊणतास लागला. वाहतूक पोलिसांची कोंडी सोडविताना दमछाक झाली. डेक्कन जिमखाना, फर्ग्युसन रस्ता, जंगली महाराज रस्त्यावर मोटारींच्या रांगा लागल्या होत्या. शनिवारी सायंकाळी शहरात पावसाच्या तुरळक सरी पडल्या. पावसामुळे अनेकजण मोटारीतून बाहेर पडले होते. रस्त्यावर मोठ्या संख्येने मोटारी आल्याने कोंडीत भर पडली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा कोथरुड भागातील एका शैक्षणिक संस्थेत कार्यक्रम होता. उपमुख्यमंत्र्यांच्या ताफा जाणार असल्याने पौड रस्ता, कर्वे रस्ता भागातील वाहतूक व्यवस्थेत तात्पुरते बदल करण्यात आले होते. महत्वाच्या चौकातील वाहतूक नियंत्रक दिवे बंद ठेवण्यात आले होते.

# न्यासांच्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी कायमस्वरुपी यंत्रणा हवी!

## शरद पवार यांच्या हस्ते करण्यात आले विश्वस्त परिषदेचे उद्घाटन

।पुणे। महाईन्यूज ।

**कोणतीही संस्था चालविणे हे सोपे काम नाही. पण, योग्य ती खबरदारी घेतली गेली, तर धर्मादाय कार्यालयातील अडचणींना तोंड द्यावे लागत नाही, असा अनुभव आहे. राज्यात कार्यरत असलेल्या न्यासांच्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी केंद्र सरकार, राज्य सरकार, संस्थाचालक आणि धर्मादाय कार्यालय यांच्यात सुसंवाद घडविण्यासाठी कायमस्वरुपी यंत्रणा उभारणे गरजेचे आहे, असे मत माजी केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांनी शनिवारी व्यक्त केले.**



पब्लिक ट्रस्ट प्रॅक्टिशनर्स असोसिएशनच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित विश्वस्त परिषदेचे उद्घाटन शरद पवार यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते. खासदार गिरीश बापट, राज्याचे धर्मादाय आयुक्त महेंद्र महाजन, असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. शिवराज कदम जहागिरदार, उपाध्यक्ष ॲड. मोहन फडणीस, खजिनदार ॲड. रजनी उकरंडे आणि सचिव ॲड. सुनिल मोरे या वेळी व्यासपीठावर होते. पवार म्हणाले, सामाजिक संस्थांकडील समाजाचा पैसा खर्च करताना धर्मादाय आयुक्तालयाची परवानगी असणे आवश्यक आहे. मात्र, त्या यंत्रणेमध्ये सुलभता असणे गरजेचे आहे. वैद्यकीय संस्था, ग्रामीण भागातील जुनी मंदिरे, शैक्षणिक संस्थांचे देखील अनेक प्रश्न आहेत. त्यांच्या निराकरणासाठी सुसंवाद व्हायला हवा. धर्मादाय कार्यालयांमध्ये डिजिटायझेशन, आधुनिकता व नवीन तंत्रज्ञानाचा वापर होणे गरजेचे आहे.

बापट म्हणाले, कायदा जन्माला येण्यापूर्वी पळवाटा येत असल्यामुळे त्या कायद्याचा उद्देश सफल होत नाही. शिक्षणमहर्षींची जागा आता शिक्षणसम्राटांनी घेतली आहे. धान्याऐवजी या सर्वांकडे पैशाचे पोते आहे. अनेक विद्यार्थी आज शिकू पहात आहेत, त्यांच्यासाठी शिक्षणाचा मार्ग मोकळा करून द्यायला हवा. महाजन म्हणाले, राज्यभरात सव्वानऊ लाख ट्रस्ट आणि संस्था आहेत. करोना काळात सर्वांनी सोबत येऊन समाजाला मदत केली आहे. धर्मादाय आयुक्तालयाचे काम ३५ जिल्ह्यांमध्ये सुरू आहे. राष्ट्रीय आणि राज्यावर येणाऱ्या संकटांना तोंड देताना केवळ शासनावर अवलंबून न राहता सामाजिक संस्थांनी एकत्र येऊन योगदान द्यावे. कायद्याची तरतुदी व इतर बाबींमध्ये विश्वस्तांना येणाऱ्या अडचणी निश्चितपणे सोडवू.

ॲड. कदम म्हणाले, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम हा धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक आस्थापनांचे नियमन करणारा कायदा १९५० साली अंमलात आला. ७० वर्षांपूर्वीच्या कायद्यातील तरतूदींमध्ये कालसुसंगत बदल होणे क्रमप्राप्त आहे. कायद्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांनी जलद न्यायदान प्रणाली अवलंबली पाहिजे. कामकाजशैलीत आधुनिकीकरण झाले नाही तर धमार्दाय अस्थापनेसाठी ही धोक्याची घंटा ठरेल.

### लोकप्रतिनिधींचे प्रबोधन व्हावे

**धर्मादाय आयुक्तालयाच्या पुणे विभाग कार्यालयाची जागा ही मोठी अडचण आहे. १०५ पदांची मान्यता असून केवळ ६० लोकांमध्ये काम सुरू आहे. पुण्यातील ७५ हजार संस्थांच्या अडचणी या कार्यालयाद्वारे सोडविल्या जातात. मात्र, येथे साधे झेरॉक्स मशिन ठेवायला देखील जागा नाही, असे अनेक प्रश्न आहेत. यामध्ये लोकप्रतिनिधींचेही प्रबोधन करायला हवे, याकडे खासदार गिरीश बापट यांनी लक्ष वेधले.**

**बापट म्हणाले, कायदा जन्माला येण्यापूर्वी पळवाटा येत असल्यामुळे त्या कायद्याचा उद्देश सफल होत नाही. शिक्षणमहर्षींची जागा आता शिक्षणसम्राटांनी घेतली आहे. धान्याऐवजी या सर्वांकडे पैशाचे पोते आहे. अनेक विद्यार्थी आज शिकू पहात आहेत, त्यांच्यासाठी शिक्षणाचा मार्ग मोकळा करून द्यायला हवा. महाजन म्हणाले, राज्यभरात सव्वानऊ लाख ट्रस्ट आणि संस्था आहेत. करोना काळात सर्वांनी सोबत येऊन समाजाला मदत केली आहे. धर्मादाय आयुक्तालयाचे काम ३५ जिल्ह्यांमध्ये सुरू आहे. राष्ट्रीय आणि राज्यावर येणाऱ्या संकटांना तोंड देताना केवळ शासनावर अवलंबून न राहता सामाजिक संस्थांनी एकत्र येऊन योगदान द्यावे. कायद्याची तरतुदी व इतर बाबींमध्ये विश्वस्तांना येणाऱ्या अडचणी निश्चितपणे सोडवू.**

# विश्वकल्याण स्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालयात 'ग्रॅन्डपॅरेंट्स डे' उत्साहात

## शहरीकरणात दुरावलेले नाते घट्ट करण्यासाठी शाळेतील हा आदर्श उपक्रम

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज

**शहरीकरण आणि लघु कुटुंबपद्धतीच्या आजच्या जमान्यात आजी-आजोबा हे नाते दुरावले आहे. मात्र, हे दुरावलेले नाते घट्ट करण्यासाठी चिखलीतील विश्वकल्याण स्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय येथे आजी-आजोबा दिन साजरा करण्यात आला. या वेळी घेण्यात आलेल्या स्पर्धांमध्ये आजी-आजोबांनी प्रत्यक्ष सहभाग नोंदवून कार्यक्रमाची रंगत आणखीनच वाढविली.**





चिखलीतील सोनवणे वस्तीमधील विश्वकल्याण स्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालयात नुकताच आजी आजोबा दिन साजरा करण्यात आला. यावेळी संस्थापक जितेंद्र मेहता, शाळेच्या संचालिका नीलम मेहता उपस्थित होते. आजी आजोबांविषयी लहान मुलामुलीत आदराची भावना वृद्धिंगत व्हावी यासाठी अशा प्रकारचा उपक्रम राबविण्यात आला. आपल्या आजी-आजोबांचे स्वागत चिमुकल्यांनी सुंदर नृत्याविष्काराने केले. या उपक्रमासाठी ८० पेक्षा जास्त आजी-आजोबांनी सहभाग नोंदवला होता. पूर्व प्राथमिक शिक्षकांनी विद्यार्थ्यांसाठी भाषण, खेळ आणि नृत्याचे आयोजन केले होते. सर्व आजी आजोबांनी त्यांच्यासाठी आयोजित खेळांमध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. विजेत्या आजी आजोबांना बक्षिसेही देण्यात आल्याने त्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हसू उमटले. यावेळी काही आजी आजोबांनी आपले जीवनानुभव सांगत विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली.

### चिमुकल्यांच्या सादरीकरणाने आजी-आजोबा प्रभावित

शाळेच्या मुख्याध्यापिका लक्ष्मीछाया पवार यांचे भाषण आणि आपल्या चिमुकल्यांच्या सादरीकरणाने आजी-आजोबा प्रभावित झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका भारती भदाणे यांनी केले. तर नर्सरीमधील त्या चिमुकल्यांचे बोबडे बोल असणारे भाषण झाले. त्यामध्ये मिथी, आश्रिता, चित्रा, गुप्ता कुमार, अद्विता लांडे आणि शिव चौधरी यांचा सहभाग होता.

# ‘हाय वैक्युम सक्षन मशीन खरेदीत गडबड घोटाळा!

## आमदार लक्ष्मण जगताप : ठेकेदाराला काळ्या यादीत टाका, अधिकाऱ्यांची चौकशी

**पिंपरी-चिंचवड ।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय विभागाने रुग्णालयांसाठी खरेदी केलेल्या हाय वैक्युम सक्षन मशीन खरेदीत प्रचंड गडबड घोटाळा झालेला आहे. या मशीन खरेदीसाठी काढलेल्या निविदेत नमूद टेक्निकल स्पेशिफिकेशन (तांत्रिक तपशील) आणि पुरवठादार ठेकेदाराने वैद्यकीय विभागाला प्रत्यक्ष दिलेल्या मशीनचे टेक्निकल स्पेशिफिकेशन वेगवेगळे आहेत. तांत्रिक बाबी कोणालाच कळत नसल्याचा भ्रम झालेल्या वैद्यकीय विभागातील संबंधित अधिकाऱ्यांनी आणि पुरवठादार ठेकेदाराने पिंपरी-चिंचवडकरांचे लाखो रुपये लाटण्याचा डाव रचून सर्वांनाच अक्षरशः मूर्खात काढण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची खातेनिहाय चौकशी करावी. तसेच संबंधित




ठेकेदाराला काळ्या यादीत टाकावे, अशी मागणी आमदार लक्ष्मण जगताप यांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे केली आहे.

यासंदर्भात आमदार लक्ष्मण जगताप यांनी आयुक्त शेखर सिंह यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, “महापालिकेच्या वैद्यकीय विभागाने रुग्णालयांसाठी २० हाय वैक्युम सक्षन मशीन खरेदीसाठी निविदा प्रक्रिया राबवली. त्यानंतर मे. सेबर्ड सिस्टम्स आयएनसी या पुरवठादार ठेकेदाराला कामाचा आदेश दिला आहे. त्यानुसार संबंधित पुरवठादार ठेकेदाराने वैद्यकीय विभागाला मशीन पुरवल्या आहेत. मुळात या मशीन खरेदीची निविदाच म्हणजे एक प्रकारचा गडबड घोटाळा आहे. निविदा प्रक्रियेमध्ये निश्चित केलेल्या अटी व शर्तींचे उल्लंघन करून या पुरवठादार ठेकेदाराला संबंधित अधिकाऱ्यांनी पात्र केले आहे.

निविदेत मशीनमध्ये कोणत्या टेक्निकल स्पेशिफिकेशन असावेत हे नमूद आहे. त्यानुसार पुरवठादार ठेकेदाराने वैद्यकीय विभागाला मशीन देणे कायद्याने बंधनकारक आहे. प्रत्यक्षात पुरवठादार ठेकेदाराने वैद्यकीय विभागाला दिलेल्या मशीन निविदेत नमूद टेक्निकल स्पेशिफिकेशनच्या नसल्याचे समोर आले आहे. धक्कादायक बाब म्हणजे गडबड घोटाळा करण्याच्या उद्देशाने निविदा प्रक्रिया राबवलेल्या वैद्यकीय विभागातील संबंधित अधिकाऱ्यांनी निविदेत नमूद टेक्निकल स्पेशिफिकेशन नसलेल्या मशीन पुरवठादार ठेकेदाराकडून दाखल करून घेतल्या आहेत. त्यावरून संबंधित अधिकारी सरळसरळ आर्थिक हित जोपसण्याचा प्रयत्न करत आहेत हे स्पष्ट आहे. धक्कादायक बाब म्हणजे निविदेत एका मशीनची किंमत सुमारे ६ लाख ८० हजार नमूद असून, सरकारच्या जीईएम पोर्टलवर याच मशीनची किंमत ३ ते ४ लाखांच्या घरात आहे. त्यावरून मशीन खरेदी करणाऱ्या अधिकाऱ्यांचा काय डाव होता, हे स्पष्ट होते.

### ...तर कर्मचाऱ्यांच्या आरोग्याला धोका

पुरवठादार ठेकेदाराने वैद्यकीय विभागाला दिलेल्या मशीनमध्ये निविदेत नमूद तब्बल १४ हून अधिक टेक्निकल स्पेशिफिकेशन नसल्याची बाब समोर आली आहे. मशीनमध्ये चुकीचे ऑपरेटिंग सिस्टिम, चुकीचा एअर फ्लो, व्हायरस फिल्टर नसणे, उच्चतम आवाज पातळी, मशीनमध्ये मेंब्रेन प्रणाली नसणे, इलेक्ट्रिक शॉक न लागण्याची प्रणाली नसणे, सॉलीडीफायडर नसणे यांसह अनेक त्रुटी असल्याच्या तक्रारी मला प्राप्त झाल्या आहेत. या मशीन वापरात आणल्यास उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांसह त्या मशीन हाताळणाऱ्या वैद्यकीय विभागातील कर्मचाऱ्यांच्या आरोग्याला व जिवाला धोका होऊन मोठी दुर्घटना नाकारता येत नाही.

### दोषींवर कडक कारवाई करा...

या मशीन खरेदीसाठी निविदा प्रक्रिया राबवणारे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अत्यंत बेजबाबदारपणे आर्थिक हितसंबंध जोपासत स्वतःच्या फायद्यासाठी मे. सेवर्ड सिस्टम्स आयएनसी या ठेकेदाराकडून त्रुटीयुक्त वैक्युक सक्शन मशीन घेतले आहेत. अशा मशीन घेणे महापालिकेच्या आणि रुग्णालयांमध्ये येणाऱ्या रुग्णांच्या हिताचे नसून बेकायदेशीर व नियमबाह्य आहे. त्यामुळे निविदाच तत्काळ रद्द करून अटी व शर्तींचे भंग करणाऱ्या संबंधित पुरवठादार ठेकेदाराला तातडीने काळ्या यादीत टाकण्यात यावे. त्यांनी पुरवलेल्या मशीन न घेता त्याचे पैसे अदा केले गेले असल्यास ते वसूल करण्यात यावे. त्याचप्रमाणे गडबड घोटाळा करण्याच्या उद्देशाने निविदा प्रक्रिया राबवून चुकीच्या टेक्निकल स्पेशिफिकेशनचे मशीन दाखल करून घेणाऱ्या वैद्यकीय विभागातील संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची खातेनिहाय चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही आमदार जगताप यांनी केली आहे.

# पुणे विद्यापीठात सायकलींना प्रवेशासाठी आंदोलन!

## ‘इंडो ॲथलेटिक्स’चा पुढाकार : अन्य वाहनांचा मुक्त संचार, सायकलींना बंदी का?

**पिंपरी।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**सावित्रीबाई फुले विद्यापीठाने घेतलेल्या सायकल निर्णयाविरोधात आज इंडो ॲथलेटिक्स सोसायटीच्या सदस्यातर्फे विद्यापीठाच्या आवारामध्ये सायकल प्रवेश द्यावा, यासाठी आंदोलन करण्यात आले. इंडो ॲथलेटिक्स संस्थेचे सदस्य गजानन खैरे म्हणाले, इतर सर्व वाहनांना विद्यापीठात मुक्तपणे प्रवेश दिला जात आहे.**



परंतु, सायकलस्वारांना बंदी घातली आहे. विद्यापीठामध्ये वातावरण चांगले असल्यामुळे बरेच जण सायकलवर सकाळी व्यायाम करण्यासाठी येतात. दिवसभर विद्यापीठांमध्ये वाहनांची वर्दळ असते. परंतु, सायकलला बंदी घातली आहे. हे आश्चर्यजनक आहे.

उमा डोंगरे म्हणाल्या, विविध कंपन्यांमध्ये त्याचप्रमाणे देशातील विविध आयआयटी व आयआयएमच्या कॅम्पसमध्ये फक्त सायकलला प्रवेश आहे.

इतर वाहनांना बंदी आहे. या निर्णयामुळे सायकल संघटनांमध्ये संतापाची लाट आहे. अजित पाटील म्हणाले, एकेकाळी पुणे हे सायकलींचे शहर होते.

परंतु, विद्येचे माहेरघर असलेल्या विद्यापीठाकडून अशा निर्णयाची अपेक्षा नाही.

### सायकलविरोधी निर्णय मागे घ्यावा

विद्यापीठांमध्येदेखील सायकल ट्रॅक्स झाले पाहिजेत. लवकरात लवकर सायकलविरोधी निर्णय मागे घ्यावा, सायकलस्वारांवर घातलेली बंदी उठवावी, असे निवेदन कुलगुरूंना देण्यात आले. आंदोलनात गिरिराज उमरीकर, श्रेयस पाटील, गिरीश परदेशी, सुनील चाको, रमेश माने, बाळासाहेब कांबळे, अजित गोरे, संदीप परदेशी, अमीर शेख, अमीन शेख, उमा डोंगरे, सुरेश माने, सुहास पवार, युवराज पाटील आदींनी महत्त्वाची भूमिका बजावली.

## संपादकीय »

# शेतकऱ्यांचे मरण कधी संपणार!

*'माझ्या देशातील समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन...'*

'माझ्या देशातील समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन...' रोज स्मरावी अशा या भारतीय प्रतिज्ञेतील कुठल्या परंपरांच्या पात्रतेशी आपण स्पर्धा सुरू केली आहे, असा उद्विग्न प्रश्न कुणालाही विचारला जाऊ शकतो. सध्याचे वातावरणच तसे आहे. सण-समारंभांचे उन्मादी स्वागत ही आपली परंपरा आहे की, 'परदु:खे उपकार करे' हा आपला रिवाज? कुण्या एका सरकारच्या माथी दोषाचा घडा फोडून समस्या सुटणार नाहीत. मागील साडेआठ महिन्यांत आत्मघात ओढवून घेणाऱ्या वैदर्भीय शेतकऱ्यांची संख्या ९६७ झाली ही ताजी बातमी आहे. या पार्श्वभूमीवर पात्र आणि अपात्रतेचा सरकारी तंटा समजून घ्यायला हवा. सहवेदनेच्या जाणिवेत तुम्ही पात्र ठरलात काय, असा प्रश्न हळहळत्या घरांनी महाराष्ट्राला विचारलाच, तर निरुत्तर होण्याऐवजी प्रामाणिकपणे केलेले परिश्रम आणि प्रयत्न ओठी यायला हवेत. मदत टाळणाऱ्या पात्रतेचे बदलते निकष तेव्हा कामी येणार नाहीत. असेच होत राहिले तर शेतकऱ्यांचे मरण कदापि संपणार नाही.

मागील साडेआठ महिन्यांनी वैदर्भीय दाह सर्वांच्याच उंबऱ्यापर्यंत नेऊन ठेवला. त्याची जाणीव मात्र अद्याप हवी तशी झालेली नाही. सीमांनुसार वेदनांची प्रतवारी करणे माणुसकीला धरून नाही. शेतकऱ्यांचे दु:ख अवघ्या राज्याचे दु:ख आहे. चालत आलेल्या दुर्लक्षी परंपरांचा पाईक होण्याची पात्रता अंगी बाणवायची की मदतीपासून अपात्र ठरलेल्या जीवांचे कढ समजून घ्यायचे, याचा निर्णय करावा लागेल. शासकीय व्यवस्थेला त्यात लक्ष घालावे लागेल. अमरावती विभागाचा लेखाजोखा स्वयंस्पष्ट आहे. जीव लावून तो समजून घेण्याच्या सरकारी पुढाकाराची राज्याला प्रतीक्षा आहे. मागील वीस-एकवीस वर्षांतील १८ हजारांवर शेतकरी आत्महत्यांपैकी साडेनऊ हजार आत्महत्या अमरावती विभागात अपात्र ठरविण्यात आल्या. साडेआठ हजारांहून कमी प्रकरणे मदतीसाठी पात्र ठरली. काही प्रकरणे अद्यापही चौकशीसाठी ताटकळत आहेत. हे कटू सत्य किती जणांना ठाऊक आहे हासुद्धा मोठा प्रश्न आहे. एखाद्या प्रदेशाला दु:खाचे इतके डंख बसावेत की त्यातून सावरण्यासाठीही वेळ मिळू नये अशा भयावह स्थितीतून राज्याचा कोपरा जातो आहे. आत्महत्यांच्या सातत्यामुळे संवेदनशीलता तर हरपली नाही ना, अशी शंका घेण्याजोगे वर्तमान आहे.



## आनंदी सकाळ

# वर्णाश्रम धर्म कालबाह्य, अनावश्यक व अस्वीकृत

भारतीय सनातन धर्म अखिल मानवजातीच्या कल्याणासाठी आहे. वासुदेव कृष्णाने प्रतिपादित केलेला, आदिपुरुष नारायणाकडून निर्माण झालेला सनातन धर्म अखिल जगतासाठी आहे.श्रीमद्भागवताच्या सातव्या स्कंधात ११ व्या अध्यायात नारदाने युधिष्ठिराला या धर्माचा उपदेश दिला आहे.त्यापूर्वी भगवान नारायणाने बदरिकाश्रमात नारदाला सनातन धर्मांची तीस लक्षणे सांगितली होती. सत्य, दया, तप, पावित्र्य, सहनशक्ती, सारासार विवेक, शम, दम, अहिंसा, त्याग, ब्रम्हचर्य, स्वाध्याय, साधेपणा,संतोष, समदर्शिता,सेवाभाव, दैहिक सुखांचा त्याग, मौन, आत्मचिंतन ईश्वराला चराचरात अनुभवणे, विपरीत कर्मफलांचे चिंतन,सर्व प्राणीमात्रांमध्ये ईश्वराचा निवास असल्याची अनुभूती, सर्व प्राण्यांना त्यांचा योग्य वाटा देणे, श्रवण कीर्तन, स्मरण, प्रभू-सेवा,नम्रता,दास्यभाव, सख्यभाव, आत्मसमर्पण भाव, अशी तीस लक्षणे भागवतात सांगितली आहेत. ज्यातून मनुष्यत्वाची जोपासना होऊन आयुष्याला उच्च,उदात्त ध्येय प्राप्त होते.

# मराठवाड्याची दशा व दिशा!




मराठवाडा महाराष्ट्रातील एक अत्यंत निसर्ग व मानव प्रतिभासंपन्न प्रदेश आहे. आजमितीला मराठवाड्याची लोकसंख्या सव्वादोन कोटी आहे. प्रदेशाचे क्षेत्रफळ ६५ हजार चौरस किलोमीटर आहे. मात्र, या प्रदेशाच्या वाट्याला राज्य उत्पन्नातील जेमतेम दहा टक्केच हिस्सा प्राप्त होतो; कारण येथील शेतकरी व शेतमजूराला त्याच्या श्रमाचे व मालाचे मोल फार कमी मिळते. पायाभूत सुविधांची कमतरता असल्यामुळे शेतकऱ्यांना मिळणारा मोबदला कमी आहे. मराठवाडा व विदर्भाच्या बहुतांश पुढाऱ्यांनी फळे चाखण्याऐवजी बीज फस्त



केले. परिणामी आत्महत्याग्रस्त शेतकरी, शेतमजूर, महागाईने त्रस्त व तर नेते संपत्तीने मस्त असे समीकरण हैदराबाद मुक्तिसंग्रामाच्या ७४ वर्षांनंतरही पाहावयास मिळते.

येथील जमीन खोल काळोची व सुपीक शेती. मात्र पीकरचनेतील अनाठायी बदल, धूप, कुरणे, झाडझाडोरा, बनआच्छादनात लक्षणीय घट आणि जैवविविधतेचा ऱ्हास यामुळे शेती नापीक बनली आहे. पर्जन्यमानही सर्व शेती पाण्याच्या गरजा भागविण्यास आवश्यकतेएवढे आहे. पशुधनही मुबलक आहे. मात्र त्यात मोठी घट होत आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे कष्टकरी बळीराजा, कलाकसुर हुन्नरी कारागीर हा येथील मोठा वारसा व संशोधन आधार आहे. १९७२ व लागोपाठच्या अवर्षण व शेतीची विषम मालकी यामुळे कष्टकरी लोकांनी शहराकडे स्थलांतर केले.

काळाच्या ओघात मराठवाड्यात शिक्षणाचे बाजारीकरण, सुमारीकरण व विकृतीकरण झाल्याचे चित्र दिसते. शिक्षण व सहकाराच्या माध्यमाने जिल्ह्या-जिल्ह्यात कोट्यधीशच नव्हे, तर अब्जाधीश नेते (सर्वजातीय) उभे राहिले. सहकाराच्या क्षेत्रातील साखर कारखाने, सूत गिरण्या, सेवा, सोसायट्या, खरेदी-विक्री संघ, बाजार समित्या, दूध संघ यांच्या जमिनी व अनुदानांचा गैरव्यवहार झाल्याचे अनेक ठिकाणी दिसते. सहकारी संस्थांचे कंपनीकरण व टोळीकरण झाले.

व्यापारी, व्यावसायिक, उद्योजक प्रभावळ विस्तारित बाजारपेठ, कंत्राटीदारी, पायाभूत प्रकल्प, मागास भागाच्या नावाने अनुदाने, प्रोत्साहने लाटण्याचा महाउद्योग रातोरात उदयास आले. कारखाने, हॉटेल, परमीट रूम, मद्यालय, गॅस पेट्रोल पंप, मोटार वाहन यांचे उद्योग बहुतांश राजकीय मंडळींनी मराठवाड्याच्या विकासाच्या गोंडस नावाने तालुक्या-तालुक्यात सुरू केले. मराठवाड्याच्या ७६ तालुक्यांत व आठ जिल्ह्यांत किमान हजारभर अब्जाधीश, लाखो कोट्याधीश आहेत. हे अंदाजे २५ लाख लोक (पाच लाख कुटुंबे) सोडली, तर मराठवाड्यातील जनतेची अवस्था अत्यंत विदारक आहे. तरुणांच्या समोर संभ्रमावस्था आहे.

# नव्या भारतासाठी दूरदृष्टी

**रस्ते आणि महामार्ग पायाभूत सुविधा विकासाच्या सर्व प्रकल्पांची आज जी अभूतपूर्व प्रगती झाली आहे, ती पंतप्रधान मोदी यांच्या सक्षम आणि कार्यतत्पर नेतृत्वाशिवाय आणि त्यांच्या दूरदृष्टीशिवाय कधीही शक्य झाली नसती.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज, शनिवारी ७२ वर्षे पूर्ण करीत आहेत. या निमित्ताने त्यांच्या मंत्रीमंडळातील सहकारी नितीन गडकरी यांचा हा लेख.

रस्ते आणि महामार्ग पायाभूत सुविधा विकासाच्या सर्व प्रकल्पांची आज जी अभूतपूर्व प्रगती झाली आहे, ती पंतप्रधान मोदी यांच्या सक्षम आणि कार्यतत्पर नेतृत्वाशिवाय आणि त्यांच्या दूरदृष्टीशिवाय कधीही शक्य झाली नसती. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज, शनिवारी ७२ वर्षे पूर्ण करीत आहेत. या निमित्ताने त्यांच्या मंत्रीमंडळातील सहकारी नितीन गडकरी यांचा हा लेख.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाजातल्या सर्व घटकांना मूलभूत सुविधा प्राप्त होऊ शकतील, असे स्वयंपूर्ण राष्ट्र घडवण्यासाठी २०१४ मध्ये पंतप्रधानपदाचा आपला प्रवास सुरू केला. विकासाचा झपाटा आणि व्यापकता ही त्यांच्या नव्या 'रायझिंग इंडिया'ची



ओळख ठरली आहे. क्षमता, पारदर्शकता, वेगवान; तसेच समाजातल्या तळापर्यंत सुलभतेने सेवा प्रदान करण्यात मोदींच्या नेतृत्वाखाली सरकार मोठ्या प्रमाणात यशस्वी ठरत आहे. 'सब का साथ, सब का विकास' हा मंत्र घेऊन २०२४-२५ पर्यंत भारताची अर्थव्यवस्था पाच लाख डॉलर करण्याचे उद्दिष्ट ठेवून हे सरकार नवी शिखरे गाठू इच्छिते.

पंतप्रधानांनी २०२१मध्ये 'पीएम गती शक्ती नॅशनल मास्टर प्लॅन' जारी केला. पायाभूत सविधा क्षेत्राला अधिक 'गती' देऊन त्याद्वारे नव भारत उभारणीसाठी अधिक 'शक्ती' देण्यासाठी हा आराखडा आखण्यात आला. 'आत्मनिर्भर भारताचा निर्धार घेऊन पुढील २५ वर्षांसाठी भारताचा पाया घालण्यात येत आहे. प्रकल्प वेळेत पूर्ण करण्याची कार्य संस्कृती आम्ही विकसित केली आहे. इतकेच नव्हे तर ते वेळेआधीच पूर्ण करण्याचा आमचा प्रयत्न आहे,' असे पंतप्रधान त्या वेळी म्हणाले होते. देशाच्या सर्व विकासात्मक घडामोडींना विस्कळित करणाऱ्या साथरोगाच्या, तसेच भू-राजनैतिक संकटाच्या कसोटीच्या काळाशी मुकाबला करून, वेगवान प्रगतीसाठीच्या आपल्या निर्धाराची प्रचीती भारताने दिली आहे.

येत्या २५ वर्षांत भारताला विकसित राष्ट्र करणे हे पंतप्रधानांच्या संकल्पनेतल्या या मास्टर प्लॅनचे उद्दिष्ट आहे. देशाच्या विविध भागांत, विशेषत: आदिवासी भागात, डोंगराळ भागात आणि ईशान्येकडील प्रदेशात सर्वसमावेशक आणि व्यापक विकासासाठी पायाभूत कनेक्टिव्हिटी प्रकल्पांचे एकात्मिक नियोजन आणि समन्वयाची अंमलबजावणी सुरू आहे.

## ।। अभंगवाणी ।।



उपाधीच्या नांवें घेतला सिंतोडा ।
नेदूं आतां पीडा आतळों ते ॥१॥
काशासाठीं हात भरूनि धुवावे ।
चालतिया गोवे मारगासि ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# "विकासकामांच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार"

। सांगली । महाईन्यूज ।



राष्ट्रवादीचे आमदार एकनाथ खडसे यांनी शिंदे गटाचे आमदार चंद्रकांत पाटील यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. मुक्ताईनगर विधानसभा मतदारसंघात काम न करता बिले काढण्याची स्पर्धा लागली आहे. ठेकेदार आणि अधिकारी यांच्या संगनमताने ९ कोटी रुपयांचं बिल काम न करता काढलं. नियमबाह्य कामांना स्थगिती देत हा भ्रष्टाचार लपविण्याचा प्रयत्न केला, असा आरोप त्यांनी केला आहे. तसेच आमदार विकासकामं मंजूर करुन आणतात अन् काम न करता ठेकेदार आणि अधिकाऱ्यांच्या मदतीने बिले काढतात, असा आरोप त्यांनी पाटील यांच्यावर केला आहे. खडसेंचा चंद्रकांत पाटलांवर आरोप या प्रकरणी उच्च न्यायालयात खटला दाखल केला होता.

यात उच्च न्यायालयाने तिन्ही अधिकाऱ्यांना नोटीस काढल्या आहेत. एक रुपयांचं काम न करता, कोट्यवधी रुपयांची बोगस बिले काढली जातात.

### अनेक कामांना स्थगिती

**मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री २० सप्टेंबर रोजी जळगाव जिल्ह्याचा दौऱ्यावर आहेत. या दोघांचे मी स्वागत करतो. शेकडो कामं मंजूर आहेत. मात्र, त्यांना स्थगिती दिली आहे. तर काही कामे मंजूरीच्या प्रतिक्षेत आहेत. विकासकामांची स्थगिती उठवावी आणि इतर कामांना मंजूरी द्यावी, अशी विनंती खडसेंनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. तसेच मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री विकासकामांना निधी देतील आणि स्थगिती उठवतील, अशी आशाही त्यांनी व्यक्त केली आहे.**

# महाराष्ट्र म्हणजे पाकिस्तान आहे का?

## वेदान्त प्रकल्पावरून आदित्य ठाकरेंचा फडणवीसांना बोचरा सवाल

। मुंबई । महाईन्यूज ।



**आदित्य ठाकरे यांनी यावेळी सरकारने लावलेल्या चौकशीवर भाष्य केलं. महाराष्ट्रासाठी कोणी काही बोलायला लागलं की त्याच्यावर आरोप करायचे, त्याची बदनामी करायची, त्याची चौकशी मागायची म्हणजे महाराष्ट्राचा आवाज बुलंद करणं, हा आपल्या देशात गुन्हा झालाय का? असा सवाल आदित्य ठाकरे यांनी उपस्थित केला. तसंच पुढे ते म्हणाले, चौकशी कोणाची करणार? केंद्राची करणार की अग्रवाल यांची करणार? असे प्रश्न उपस्थित करत आदित्य ठाकरेंनी राज्य सरकारला कोंडीत पकडलं.**

शिवसेना नेते आणि आमदार आदित्य ठाकरे यांनी वेदान्त प्रकल्पावरून शिंदे-फडणवीस सरकारला चांगलंच घेरलं आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुजरात म्हणजे पाकिस्तान आहे का? या वक्तव्याचा आदित्य ठाकरे यांनी चांगलाच समाचार घेतला. महाराष्ट्र म्हणजे पाकिस्तान आहे का, ज्यामुळे प्रकल्प गुजरातला पळवून लावला. महाराष्ट्राच्या मुलांनी काय चूक केली? असा खरमरीत सवाल आदित्य ठाकरे यांनी राज्य सरकारला विचारला. आदित्य ठाकरे यांनी आज थोर समाज सुधारक संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील अग्रणी स्वर्गीय प्रबोधनकार ठाकरे यांच्या स्मृतिस्थळावर जाऊन अभिवादन केलं. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

आदित्य ठाकरे म्हणाले, आज माझ्या पणजोबांची जयंती आहे आणि मी अभिवादन करायला आलो आहे. माहीममधल्या शिवसैनिकांना भेटलो. माझ्या पणजोबांनी संयुक्त महाराष्ट्रासाठी लढा दिला. आज 'मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन'ही आहे. येथून गुजरातला प्रकल्प गेला, याचं कोणाला दुख नाही, याची मला खंत वाटतेय, असं आदित्य ठाकरे म्हणाले.

आदित्य ठाकरे यांनी यावेळी सरकारने लावलेल्या चौकशीवर भाष्य केलं. महाराष्ट्रासाठी कोणी काही बोलायला लागलं की त्याच्यावर आरोप करायचे, त्याची बदनामी करायची, त्याची चौकशी मागायची म्हणजे महाराष्ट्राचा आवाज बुलंद करणं, हा आपल्या देशात गुन्हा झालाय का? असा सवाल आदित्य ठाकरे यांनी उपस्थित केला. तसंच पुढे ते म्हणाले, चौकशी कोणाची करणार? केंद्राची करणार की अग्रवाल यांची करणार? असे प्रश्न उपस्थित करत आदित्य ठाकरेंनी राज्य सरकारला कोंडीत पकडलं.

आदित्य ठाकरे पुढे म्हणाले, घटनाबाह्य सरकार आल्यानंतर दोन-चार घटना घडल्या. २६ जुलैला मुख्यमंत्र्यांनी सभागृहात सांगितलं होतं की वेदान्ता महाराष्ट्रात येणार आहे, ४ लाख कोटी घेऊन येणार आहेत. एमआयडीसीच्या मॅगझीनमध्ये सांगितलं की एक लाख कोटी घेऊन येणार आहेत. अजून एक गोष्ट समोर आली की, २९ ऑगस्टला उपमुख्यमंत्री आणि अनिल अगरवाल यांची भेट झाली. ही भेट लहान भावाला प्रकल्प देण्यासाठी झाली का? असा गंभीर सवाल आदित्य ठाकरे यांनी उपस्थित केला.

# मुख्यमंत्र्यांनंतर शिवसेनेनं पुन्हा केलं ध्वजारोहण!

## मराठवाडा मुक्तिसंग्राम कार्यक्रमावरून वाद पेटला!



।औरंगाबाद । महाईन्यूज ।

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या निमित्ताने आज औरंगाबाद, नांदेडमध्ये कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. दुसरीकडे हैदराबाद मुक्तिसंग्राम दिनाच्या निमित्ताने हैदराबादमध्येही राष्ट्रीय कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. मात्र, या दोन्ही कार्यक्रमांना उपस्थित राहण्यासाठी औरंगाबादमधील शासकीय कार्यक्रम दरवर्षीप्रमाणे सकाळी नऊऐवजी सात वाजताच आटोपण्यात आला. त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हैदराबादमधील कार्यक्रमासाठी रवाना झाले. गृहमंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत हैदराबादमध्ये कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. मात्र, या पार्श्वभूमीवर वाद निर्माण झाला असून शिवसेनेकडून औरंगाबादमध्ये पुन्हा एकदा ध्वजारोहण करण्यात आलं आहे.

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या निमित्ताने दरवर्षीप्रमाणे यंदाही औरंगाबादमध्ये कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. औरंगाबादमधील विजयस्तंभाजवळ सकाळी सातच्या सुमारास ध्वजारोहण करण्यात आलं. मात्र, त्यावरून शिवसेनेकडून मुख्यमंत्र्यांवर टीकास्र सोडण्यात आलं आहे. "मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनी मुख्यमंत्र्यांकडे वेळ नाही. एकनाथ शिंदे दिल्लीच्या पातशाहांच्या आदेशावरून निर्णय घेतात आणि त्यांच्या आदेशावरूनच हैदराबादला जात आहेत", अशा शब्दांत शिवसेनेचे विधानपरिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी एकनाथ शिंदेंना लक्ष्य केलं. मुख्यमंत्र्यांनी मराठवाडा मुक्तिसंग्राम कार्यक्रमाची वेळ बदलल्याचा निषेध म्हणून शिवसेनेकडून पुन्हा एकदा सकाळी नऊ वाजता ध्वजारोहण करण्यात आलं. यावेळी विधानपरिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, खासदार चंद्रकांत खैरे आणि शिवसेनेचे इतर पदाधिकारी-कार्यकर्ते उपस्थित होते. त्यामुळे मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या पार्श्वभूमीवर राजकीय वाद पेटण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

### "हा चटावरचं श्राद्ध आटोपण्याचा प्रकार"

**"चटावरचं श्राद्ध आटोपणं म्हणतात याला. म्हणजे ना श्राद्धाचं जेवलंही जात नाही आणि ज्याला पोहोच व्हायचं त्याला पोहोचही होत नाही. म्हणजे त्याला कावळाही शिवत नाही, अशा पद्धतीने आटोपला गेलेला हा कार्यक्रम आहे. त्यामुळे शिवसेनेनं रीतसर नऊ वाजता हा कार्यक्रम केला आहे", अशी प्रतिक्रिया विधानपरिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी दिली आहे.**

### "त्यांना पातशाहांची मर्जी राखणं जास्त महत्त्वाचं वाटलं"

**"हैदराबादला जाणं अयोग्य नाही. पण वेळ आपण बदलू शकलो असतो. स्वातंत्र्यसंग्राम, प्रजासत्ताक दिन, महाराष्ट्र दिन या कार्यक्रमाच्या वेळा वर्षानुवर्षापासून ठरल्या आहेत. त्यात फार अपवादात्मक स्थितीत बदल होतात. इथे काही अपवाद नव्हताच. तुम्ही नऊऐवजी दहाला जाऊ शकले असते किंवा त्यांना विनंती करू शकले असते. पण मुख्यमंत्र्यांना महाराष्ट्र किंवा मराठवाड्यापेक्षा दिल्लीच्या पातशाहांची मर्जी राखणं महत्त्वाचं वाटलं आहे. मराठवाड्याची अस्मिता जपणं हे काम आमचं आहे. पण महाराष्ट्र दिल्लीवरून चालवला जात आहे", अशा शब्दांत दानवेंनी सत्ताधाऱ्यांना लक्ष्य केलं आहे.**

# शिवसेनेचा दसरा मेळावा शिवाजी पार्कवरच?

## उद्धव ठाकरेंनी दिले कार्यकर्त्यांना आदेश



। मुंबई । महाईन्यूज ।

विजयादशमीनिमित्त मुंबईच्या शिवाजी पार्कवर शिवसेनेकडून दरवर्षी दसरा मेळाव्याचे आयोजन केले जाते. या मेळाव्यासाठी शिवसेनेचे हजारो कार्यकर्ते राज्यभरातून मुंबईत येतात. मात्र यावर्षी शिवाजी पार्कवर दसरा मेळावा घेण्यावरून शिंदे गट आणि उद्धव ठाकरे समर्थकांमध्ये चढाओढ सुरू आहे. असे असताना आज शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शिवाजी पार्कवरील दसरा मेळाव्यासाठी मोठ्या संख्येने जमा व्हा, असे आदेश दिले आहेत. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज मुंबईतील विभाग प्रमुखाशी बैठक घेत आगामी दसरा मेळाव्यावर चर्चा केली. यावेळी शिवसेनेचा दसरा मेळावा शिवाजी पार्कवरच होणार, असा विश्वास उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला आहे. याविषयी बोलताना यावर्षी होणारा दसरा मेळावा विशेष असणार आहे. यावेळी कार्यकर्त्यांमध्ये वेगळा उत्साह आहे. मागील दोन महिन्यांपासून राज्यात ज्या घडामोडी सुरू आहेत, त्यामुळे राज्यातील आणि मुंबईतील शिवसैनिक चिडून उठलेला आहे. शिवसैनिकांच्या अंगात वेगळे तेज आलेले आहे. मात्र यावेळी उद्धव ठाकरे यांनी आजच्या बैठकीत अत्यंत संयमाची भूमिका घेतली. आपण जे काम यापूर्वी करत आलो आहोत, तेच काम करायचे आहे, असे उद्धव ठाकरे यांनी सांगितले आहे, अशी माहिती शिवसेनेच्या कार्यकर्त्याने दिली.

# उत्तर प्रदेशला पावसाचा तडाखा!

## विविध ठिकाणी भिंती कोसळून 22 जणांचा मृत्यू

।लखनौ/उन्नाव ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

उत्तर प्रदेशमध्ये मुसळधार पावसामुळे विविध ठिकाणी भिंत कोसळून २२ जण मृत्युमुखी पडले. या मृतांत लखनौमधील नऊ मजुरांचा समावेश आहे. हे मजूर भिंत कोसळून त्याखाली गाडले गेले. राज्य सरकारने मृतांच्या कुटुंबीयांना चार लाखांची मदत जाहीर केली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी या दुर्घटनांबद्दल दुःख व्यक्त केले. लखनौमध्ये, रात्रभर पडलेल्या पावसामुळे लष्करी परिसराची बांधकाम सुरू असलेली सीमा भिंत कोसळली, त्यात हे नऊ मजूर मृत्युमुखी आणि एक जखमी झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. पोलीस सहआयुक्त पियुश मोर्दिया यांनी सांगितले, की काही मजूर दिलकुशा भागातील लष्करी भागाजवळ झोपड्यांत राहत होते. गुरुवारी रात्रभर पडलेल्या मुसळधार पावसामुळे येथे बांधकाम सुरू असलेली सीमा भिंत कोसळली. ढिगाऱ्याखालून नऊ मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. उन्नाव जिल्ह्यात कंठा आणि चांदपूर झलिहाई गावात भिंत कोसळून झालेल्या दुर्घटनेत दोन मुलांसह चार जणांचा मृत्यू झाला. कांथा येथे अंकित (२०), अंकुश (४) आणि उन्नती (६) या तीन भावंडांचा रात्रभर पडलेल्या पावसामुळे त्यांच्या घराची भिंत कोसळल्याने मृत्यू झाला, असे अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी नरेंद्र सिंह यांनी सांगितले. ही घटना पहाटे दोन ते तीनच्या दरम्यान घडली. पावसामुळे त्यांच्या घराच्या नुकसानीचा अंदाज घेण्यासाठी मृतांचे पालक बाहेर असताना या घराची भिंत कोसळली. अशाच एका घटनेत चंदपूर झलिहाई गावात ६६ वर्षीय बाल गोविंद यांचा मृत्यू झाला, असेही सिंग यांनी सांगितले. या दुर्घटनेबाबत शोक व्यक्त करताना मुख्यमंत्री कार्यालयाने केलेल्या 'ट्वीट'मध्ये नमूद केले, की मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी या दुर्घटनेत झालेल्या जीवितहानीबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले. या 'ट्वीट'नुसार योगींनी या घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी चार लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याचे निर्देश दिले आहेत. जखमींवर उपचार करण्याचे निर्देश त्यांनी जिल्हा प्रशासनास दिले .



### ढिगाऱ्याखालून नऊ मृतदेह बाहेर काढण्यात यश

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी या दुर्घटनांबद्दल दुःख व्यक्त केले. लखनौमध्ये, रात्रभर पडलेल्या पावसामुळे लष्करी परिसराची बांधकाम सुरू असलेली सीमा भिंत कोसळली, त्यात हे नऊ मजूर मृत्युमुखी आणि एक जखमी झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. पोलीस सहआयुक्त पियुश मोर्दिया यांनी सांगितले, की काही मजूर दिलकुशा भागातील लष्करी भागाजवळ झोपड्यांत राहत होते. गुरुवारी रात्रभर पडलेल्या मुसळधार पावसामुळे येथे बांधकाम सुरू असलेली सीमा भिंत कोसळली. ढिगाऱ्याखालून नऊ मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत.

## शॉर्ट न्यूज »

### चित्त्याचे तब्बल ७० वर्षांनंतर भारतात पुन्हा आगमन



।नवी दिल्ली।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

तब्बल ७ दशकांनंतर भारतातून नामशेष झालेल्या चित्त्यांचे मध्यप्रदेशातील कुनो राष्ट्रीय उद्यानात आज सकाळीच आगमन झाले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, त्यांच्या ७२व्या वाढदिवसानिमित्त या चित्त्यांना १० किलोमीटर पसरलेल्या भागात सोडतील. यावेळी मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान आणि इतर मंडळी उपस्थित असतील.पाच मादी आणि तीन नर अशा एकूण आठ चित्त्यांना विशेष कार्गो फ्लाइट बोइंग-७१७ मध्ये आणण्यात आले असून ते ग्वाल्हेरमध्ये उतरले. त्यानंतर त्यांना हेलिकॉप्टरने कुनो नॅशनल पार्कमध्ये आणण्यात आले. एका वन अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, या चित्त्यांना एका महिन्यासाठी लहान प्रदेशात ठेवले जाईल आणि यानंतर दोन महिन्यांसाठी परिसराची ओळख होण्यासाठी मोठ्या भागात सोडले जाईल.

# "ही युद्धाची वेळ नव्हे!"

## पंतप्रधान नरेंद्र मोदींचा रशियाचे अध्यक्ष पुतीन यांना सल्ला

।नवी दिल्ली
। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

रशिया आणि युक्रेनमधील युद्धाच्या पार्श्वभूमीवर भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, "ही युद्धाची वेळ नव्हे," असा सल्ला शुक्रवारी रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांना दिला. सध्या जगासमोर अन्नधान्य, खते आणि इंधन टंचाई या सर्वात मोठ्या समस्या आहेत, असेही मोदी यांनी पुतीन यांच्या निदर्शनास आणले. रशियाने युक्रेनवर हल्ला केल्यानंतर पंतप्रधान मोदी आणि अध्यक्ष पुतीन यांची ही पहिलीच प्रत्यक्ष भेट होती. शांघाय सहकार्य संघटनेची (एससीओ) २२वी वार्षिक परिषद येथे झाली. त्या पार्श्वभूमीवर झालेल्या द्विपक्षीय चर्चेत पंतप्रधानांनी युक्रेन युद्धाबाबत चिंता व्यक्त केली. "आपण युद्धाबाबत दूरध्वनीवरही



चर्चा केली आहे. आता शांततेच्या मार्गाने तोडगा कसा काढता येईल, यावर चर्चा करण्याची संधी प्रत्यक्ष भेटीमुळे मिळाली," असे पंतप्रधान मोदी म्हणाले. त्यावर, "युद्धाबाबतची तुमची चिंता मी समजू शकतो. युद्ध लवकरात लवकर संपवण्याची आमचीही इच्छा आहे. मात्र युक्रेनने चर्चेत रस दाखवलेला नाही," असे पुतिन यांनी मोदींना सांगितले.

रशियाचे अध्यक्ष पुतिन, चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग, पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ, इराणचे अध्यक्ष इब्राहिम रायसी आणि शांघाय सहकार्य परिषदेच्या सदस्य देशांचे प्रमुख या वार्षिक परिषदेत सहभागी झाले आहेत.

युक्रेनवरील हल्ल्यासंदर्भात भारताने अद्याप रशियाबद्दल निषेधाचा सूर काढलेला नाही. मात्र या परिषदेच्या निमित्ताने पंतप्रधान मोदी यांनी भारताची युद्धविरोधी भूमिका स्पष्ट केली. चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांनीही गुरुवारी पुतिन यांच्याकडे अशीच चिंता व्यक्त केली होती. दरम्यान, पुतिन यांच्याशी चर्चेपूर्वी पंतप्रधान मोदी यांनी या परिषदेत करोना महासाथीनंतरच्या जागतिक अर्थव्यवस्थेवर भाष्य केले. करोनानंतरची परिस्थिती आणि युक्रेनमधील संघर्षामुळे जगापुढे आर्थिक आव्हाने आहेत. जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे. ती पूर्वपदावर आणण्याची गरज आहे, असे मोदी म्हणाले. भारताच्या आर्थिक विकासाचा संदर्भ देऊन मोदींनी सांगितले की, भारत जागतिक उत्पादन केंद्र बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. रशियाने युक्रेनवर केलेले आक्रमण आणि तैवान सामुद्रधुनीत चीनच्या आक्रमक लष्करी भूमिकेमुळे भू-राजकीय तणाव आणि गोंधळाच्या काळात आठ देशांच्या प्रभावशाली गटाची ही परिषद होत आहे. परिषदेच्या आवारात उझबेकिस्तानचे अध्यक्ष शौकत मिर्जियोयेव यांनी पंतप्रधान मोदींचे जंगी स्वागत केले.

### मोदी काय म्हणाले?

अर्थव्यवस्था पूर्वपदावर येण्याचे आव्हान सध्या जगासमोर आहे. करोना महासाथ आणि युक्रेनमधील संघर्षामुळे जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे. परिणामी, अन्न आणि ऊर्जा सुरक्षा संकट निर्माण झाले आहे. त्यासाठी लवचीक पुरवठा साखळी निर्माण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

### पुतीन काय म्हणाले?

युद्धाबाबतची तुमची (मोदी) चिंता मी समजू शकतो. युद्ध लवकरात लवकर संपवण्याची आमचीही इच्छा आहे. मात्र युक्रेनने चर्चेत रस दाखवलेला नाही.

### व्यापारात वाढ

दोन्ही देशांमध्ये व्यापार वाढत असल्याबाबत पुतीन यांनी समाधान व्यक्त केले. "भारताने रशियातून खतांची आयात आठ पटींनी वाढवली आहे. त्याचा भारतातील कृषीक्षेत्राला निश्चितच लाभ होईल," असे पुतीन म्हणाले. कच्च्या तेलाबाबतही भारत हा चीननंतर रशियाचा दुसरा मोठा आयातदार देश झाला आहे.

### 'भारताचा विकास दर अधिक'

भारताचा आर्थिक विकास दर ७.५ टक्के असून तो भविष्यात जगातील प्रमुख अर्थव्यवस्थांपेक्षा अधिक असेल, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी केले. अन्न आणि ऊर्जा सुरक्षा संकटावर मात करण्यासाठी लवचीक पुरवठा साखळीची गरजही त्यांनी व्यक्त केली.

# कुटुंबीयांनी माझ्यावर लक्ष ठेवण्यासाठी बॉडीगार्ड ठेवले!

बॉलिवूड अभिनेता आमीर खान वारंवार त्याच्या चित्रपटांमुळे चर्चेत असतो. दरम्यान, सध्या आमीर खानचा भाऊ फैसल खान देखील चर्चेत आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फैसल खानला अभिनेता सलमान खानच्या वादग्रस्त शो 'बिग बॉस 16' साठी फैसल खानला अप्रोच करण्यात आलं होतं. मात्र, फैसल खानने या शोमध्ये सहभाग घेण्यासाठी नकार देत म्हणाला की मला माझी आजादी खूप आवडते.

दरम्यान, नुकत्याच पार पडलेल्या एका मुलाखतीमध्ये फैसल खानने आमीर खानबाबत अनेक खुलासे देखील केले आहेत. त्याने सांगितले की, कुटुंबियांवर नाराज असल्यामुळे मी त्यांच्यापासून दुरावलो. परंतु ही गोष्ट त्यांना कधीही समजली नाही. त्यांनी मला मी पागल घोषित केलं. इतकंच नव्हे तर, त्यांनी मला कैद केलं, काही औषधं देऊ लागले आणि माझा फोन सुद्धा काढून घेतला. माझ्यावर लक्ष ठेवण्यासाठी बॉडीगार्ड देखील ठेवले होते. माझा जगाबरोबरचा संबंध पूर्ण पणे तोडून टाकला. काही दिवस मी हे सहन केलं. परंतु जेव्हा मला सिगरेट ओढण्यास नकार देण्यात आला. तेव्हा मी विरोध केला.



# राडा चित्रपटात गणेश आचार्य आणि हिना पांचाळ यांच्या नृत्याची जुगलबंदी

सध्या सोशल मीडियावर राडा चित्रपटाच्या टिझरला किंवा गाण्याला प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळतो आहे. साऊथ स्टाईल कमालीची ॲक्शन आणि कॉमेडी आणि सोबत रोमँटिक सीन्सचा भरणा असलेल्या 'राडा' सिनेमा येत्या 23 सप्टेंबरला प्रेक्षकांच्या भेटीस येण्यास सज्ज झाला आहे. 'राडा'(RADA) सिनेमाची सध्या सोशल मीडियावर चांगलीच हवा सुरू आहे. अशातच चित्रपटातील एक नवं कोरं 'मैनाचा पोपट झाला' हे गाणे रसिक प्रेक्षकांच्या भेटीला आले आहे. 'राडा' चित्रपटातील या आयटम सॉंगमध्ये गणेश आचार्य आणि अभिनेत्री, नृत्यांगना हिना पांचाळ यांची जुगलबंदी पाहणं रंजक ठरेल आणि हे गाणं त्याच्या ठेक्यावर थिरकायला नक्कीच भाग पाडेल यांत शंका नाही.

अवघ्या काही दिवसांतच आता रसिक प्रेक्षकांच्या मनाचा ठाव घेण्यासाठी 'राडा' सिनेमा संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होण्याच्या वाटेवर आहे. राम शेट्टी निर्मित 'राडा' या सिनेमाचा हिरो समा म्हणजेच अभिनेता आकाश शेट्टी तुप्तेवार 'राडा' या सिनेमातून सिनेविश्वात पदार्पण करत आहे. तर राम शेट्टी निर्मित, रमेश व्ही. पारसेवार आणि सुप्रिम गोल्ड प्रस्तुत, सूरज फिल्म अँड एंटरटेनमेंट बॅनरचा आणि सहनिर्माता वैशाली पेद्दावार व पँड कॉर्प – पडगीलवार कॉर्पोरेशन यांच्या या चित्रपटात आकाश शेट्टीसह मिलिंद गुणाजी, संजय खापरे, गणेश यादव, अजय राठोड, गणेश आचार्य, निशिगंधा वाड, योगिता चव्हाण, सिया पाटील, हिना पांचाळ, शिल्पा ठाकरे या कलाकारांना पाहणे रंजक ठरणार आहे.



# 'तारक मेहता...'मध्ये दिशा वकाणी परतणार की नवी अभिनेत्री येणार?

तारक मेहता का उल्टा चश्मा ही मालिका गेल्या १४ वर्षांपासून प्रेक्षकांचं मनोरंजन करत आहे. या प्रदीर्घ कालावधीत अनेक कलाकारांनी ही मालिका सोडली. मालिका आणि त्यात पात्र प्रचंड लोकप्रिय असल्याने निर्मात्यांना त्या भूमिकेसाठी नवे कलाकार शोधण्याची मोठी अडचण आहे. ही मालिका सध्या मालिकेतील तारक मेहता आणि अभिनेता शैलेश लोढा यांच्यामुळे चर्चेत आहे. शैलेश लोढा यांनी मालिका सोडल्यानंतर निर्मात्यांनी त्यांना मनवण्याचे प्रयत्न केले, पण ते आपल्या निर्णयावर ठाम असल्याने मालिकेत परतले नाहीत. त्यामुळे शेवटी निर्मात्यांनी त्यांच्या जागी नवीन कलाकाराची निवड केली आहे. दरम्यान, आता या मालिकेत आणखी एका कलाकाराच्या परतण्याची चाहते गेल्या काही वर्षांपासून वाट पाहत आहेत. त्या आहेत दयाबेन ही भूमिका साकारणाऱ्या दिशा वकाणी.



# "तू तुझ्या आयुष्याचा सुलतान..." माधुरी दीक्षितने केले गश्मीर महाजनीचे कौतुक

मराठी चित्रपटसृष्टीतील हँडसम हंक अशी ओळख असलेला अभिनेता गश्मीर महाजनी सध्या चर्चेत आहे. गश्मीरने आजवर अनेक चित्रपटांतून प्रेक्षकांचे मनोरंजन केले आहे. अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर छाप पाडणारा गश्मीर हा उत्कृष्ट नर्तकही आहे. सध्या 'झलक दिखला जा'च्या १०व्या सीझनमध्ये गश्मीर महाजनी स्पर्धक म्हणून सहभागी झालेला पाहायला मिळत आहे. त्याच्या नृत्याचे प्रेक्षकांकडून कौतुक नेहमीच होत आले आहे. पण आता माधुरी दीक्षितकडूनही गश्मीरला कौतुकाची थाप मिळाली आहे.

सोशल मीडियावर गश्मीरचा या कार्यक्रमातला एक व्हिडीओ खूप व्हायरल होत आहे. त्यात गशमीरने 'सुलतान' गाण्यावर नृत्य करत त्याच्या आयुष्यात केलेला संघर्ष दाखवला आहे. अभिनेते रवींद्र महाजनी यांचा मुलगा गश्मीरसाठी अभिनयातील करिअरची वाट निवडणे सोपे नव्हते.



# आर्यन खानच्या प्रेमात पाकिस्तानी अभिनेत्री?



बॉलिवूडचा किंग शाहरुख खानचा मुलगा आर्यन खान सध्या सोशल मीडियावर चर्चेत असतो. मागच्या वर्षी मुंबई क्रुझ ड्रग्ज केस प्रकरणात आर्यनला एनसीबीकडून अटक करण्यात आली होती. जवळपास सहा महिन्यांनंतर या प्रकरणात आर्यनला एनसीबीकडून क्लीन चीट देण्यात आली होती. आर्यन खानने नुकतंच 'आदिदास' या मोठ्या कंपनीसाठी फोटोशूट केले आहे. या फोटोशूटमधले काही फोटो त्याने सोशल मीडियावर पोस्ट केले आहेत. आर्यनने 'NMD_V3' हे आदिदास कंपनीचे शूज घातलेले आहेत. आर्यन खानचे अनके मित्रमैत्रिणीदेखील आहेत. एका पाकिस्तानी अभिनेत्रीने आर्यन खानबद्दलची एक खास पोस्ट शेअर केली आहे. या पाकिस्तानी अभिनेत्रीचं नाव आहे 'सजल अली', फवाद खानच्या 'बेहद'मध्ये सजल अलीने एका त्रासलेल्या मुलीची भूमिका साकारली होती, जी आपल्या आईच्या प्रियकराच्या प्रेमात पडते. या चित्रपटातील तिच्या कामाचे समीक्षकांनी कौतुक केले होते. सजल अलीने तिच्या इन्स्टा स्टोरीवर आर्यन खानचा फोटो पोस्ट केला आहे.

## शॉर्ट न्यूज »

### जागतिक कुस्ती स्पर्धा : रविकुमारचे आव्हान संपुष्टात



**बेलग्रेड । महाईन्यूज**

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील यशस्वी कामगिरीनंतर जागतिक अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेत मात्र भारतीयांची निराशाजनक कामगिरी कायम राहिली. ऑलिम्पिक रौप्यपदक विजेत्या रविकुमार दहियाचे आव्हान सुरुवातीलाच संपुष्टात आले. फ्री-स्टाइल प्रकारात आता नवीन मलिकला (७० किलो) कांस्यपदकाची संधी आहे. भारताच्या आशा प्रामुख्याने बजरंग पुनिया, रविकुमार दहिया आणि दीपक पुनिया यांच्यावर होत्या. मात्र, स्पर्धेपूर्वी सरावादरम्यान झालेल्या दुखापतीमुळे विनोद पुनियाला माघार घ्यावी लागली. रवि दहिया (५७ किलो) पात्रता फेरीतच पराभूत झाला. त्यामुळे आता भारताच्या आशा ६५ किलो वजनी गटात बजरंगवर अवलंबून असतील. बजरंगची लढत शनिवारी होणार आहे. यानंतर भरपाई वेळेत मार्को असेन्सियोने गोल करीत संघाची आघाडी दुप्पट केली.


72 व्या वाढदिवसानिमित्त

# पंतप्रधान नरेंद्र मोदींवर दिग्गज भारतीय क्रिकेटपटूंनी केला शुभेच्छांचा वर्षाव

## माजी भारतीय प्रशिक्षक रवी शास्त्रींनी देखील दिल्या शुभेच्छा

**।डर्बी । महाईन्यूज ।**

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आज (१७ सप्टेंबर) त्यांचा ७२ वा वाढदिवस साजरा करत आहेत. जगभरातील सर्वात लोकप्रिय नेत्यांपैकी एक, नरेंद्र मोदी २०१४ मध्ये पहिल्यांदा भारताचे पंतप्रधान झाले आणि २०१९ मध्ये दुसऱ्यांदा पंतप्रधान झाले. त्यांच्या नेतृत्वाखाली भारत सरकार कामकाज करत आहे. या निमिताने अनेक भारतीय आजी – माजी खेळाडूंनी मोदींवर ट्विटरवरून शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. यामध्ये माजी भारतीय प्रशिक्षक रवी शास्त्रींनी देखील शुभेच्छा दिल्या आहेत.



**भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे पंतप्रधान होण्याआधी गुजरातचे मुख्यमंत्री होते त्यामुळे त्यांना गुजरात आणि सौराष्ट्र क्रिकेट नियामक मंडळाकडून खेळणाऱ्या गुजरातच्या काही खेळाडूंनीही शुभेच्छा दिल्या आहेत. पंतप्रधान मोदी हे एक खूप मोठे क्रिकेट प्रेमी आहेत आणि ते पुरुष आणि महिला या दोन्ही क्रिकेट संघांना जवळून फॉलो करतात. राष्ट्राला संबोधित करण्यासाठी रेडिओवरील कार्यक्रम "मन की बात" मध्ये त्यांच्या कामगिरीबद्दल नेहमीच कौतुक देखील करत असतात. क्रिकेट हा असा खेळ आहे की जो संपूर्ण देशाला एकत्र आणतो**

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे पंतप्रधान होण्याआधी गुजरातचे मुख्यमंत्री होते त्यामुळे त्यांना गुजरात आणि सौराष्ट्र क्रिकेट नियामक मंडळाकडून खेळणाऱ्या गुजरातच्या काही खेळाडूंनीही शुभेच्छा दिल्या आहेत. पंतप्रधान मोदी हे एक खूप मोठे क्रिकेट प्रेमी आहेत आणि ते पुरुष आणि महिला या दोन्ही क्रिकेट संघांना जवळून फॉलो करतात. राष्ट्राला संबोधित करण्यासाठी रेडिओवरील कार्यक्रम "मन की बात" मध्ये त्यांच्या कामगिरीबद्दल नेहमीच कौतुक देखील करत असतात. क्रिकेट हा असा खेळ आहे की जो संपूर्ण देशाला एकत्र आणतो असे पंतप्रधान मोदी नेहमी सांगतात. मिताली राज हिने शुभेच्छा देताना असे म्हटले आहे की, "पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वात देशाचा विकास मोठ्या प्रमाणावर झाला आहे." त्यांच्या उत्तम आरोग्यासाठी सुभेच्छा दिल्या आहेत.

# जागतिक युवा बुद्धिबळ स्पर्धा आनंद, इलामपार्थी यांना जागतिक युवा विजेतेपद

**।मामाया । महाईन्यूज ।**

भारताच्या प्रणव आनंद आणि ए. आर. इलामपार्थी यांनी शुक्रवारी जागतिक युवा बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेच्या खुल्या गटातील अनुक्रमे १६ आणि १४ वर्षांखालील गटांचे विजेतेपद पटकावले.

अग्रमानांकित आनंदने ११ डावांमध्ये एकूण नऊ गुणांची कमाई करताना अर्ध्या गुणाच्या फरकाने बाजी मारली. आनंद संपूर्ण स्पर्धेत अपराजित राहिला. त्याने सात सामन्यांत विजय मिळवले, तर चार सामने बरोबरीत सोडवले. आनंदने १०व्या डावात अर्मेनियाच्या ईमिन आहोनयाला हरवले, तर अखेरच्या डावात फ्रान्सच्या ड्रोइन ऑगस्टिनशी बरोबरी साधली. द्वितीय मानांकित एम. प्रणेशने एकूण आठ गुणांसह अन्य तिघांच्या साथीने संयुक्तपणे तिसरे स्थान मिळवले. इलामपार्थीने ११ डावांमध्ये एकूण ९.५ गुण प्राप्त केले. त्यानेही अर्ध्या गुणाच्या फरकाने सरशी साधली. इलामपार्थीने चौथ्या डावात युक्रेनच्या आर्टीम बेरिनकडून पराभव पत्करला. पण याव्यतिरिक्त नऊ सामन्यांत विजय मिळवले, तर एक बरोबरीत सोडवला. १८ वर्षांखालील गटात सोहम कामोत्राने एकूण सात गुणांसह १४वे स्थान मिळवले, तर एस. हर्षदला (६.५ गुण) २४वे स्थान मिळाले.





# टेनिसपटू अंकिता रैना-पुनीत बालन ग्रुपमध्ये सामंजस्य करार!

## अनेक शालेय तसेच विभागीय स्पर्धांमध्ये वर्चस्व गाजविलेली अंकिताने रैना

**।पुणे । महाईन्यूज ।**

सन २०१६ च्या दक्षिण आशियाई टेनिस स्पर्धेत एकेरी व मिश्र दुहेरी अशा दोन्ही गटात सुवर्णपदक पटकावणाऱ्या अंकिता रैना व पुनीत बालन ग्रुप यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला असल्याची माहिती उद्योजक पुनीत बालन यांनी दिली.

मूळ काश्मीरी पंडित असणाऱ्या अंकिताचा जन्म गुजरातमध्ये झाला. मोठा भाऊ अंकित रैनाला टेनिस खेळाताना पाहून अंकिता प्रभावित झाली आणि पुण्यातील पीवायसी येथे प्रशिक्षक हेमंत कोद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली सरावाला सुरुवात केली. कामगिरीचा आलेख सातत्याने

**"अंकिता सारखे खेळाडू भारताचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर चमकावत असतात. अशा प्रतिभावान खेळाडूंशी जोडलो गेल्याचा आनंद होत आहे. उद्या याच खेळाडूंकडून प्रेरणा घेऊन नवीन खेळाडू तयार होतील आणि राज्याचं आणि देशाचं नाव उंचावतील, असा विश्वास आहे".**
**- पुनीत बालन,** उद्योजक, पुणे.

उंचावताना अंकिताने अनेक शालेय तसेच विभागीय स्पर्धांमध्ये आपले वर्चस्व गाजविले.



आयटीएफ सर्किट स्पर्धेत खेळताना अंकिताने तब्बल ११ एकेरीत तर १८ मिश्र दुहेरीत विजेतेपदे पटकावली आहेत. सन २०१८ मध्ये अंकिताने आशियाई स्पर्धेत कांस्य पदकाची कमाई केली. यापूर्वी केवळ भारताची टेनिसपटू सानिया मिर्झाने या स्पर्धेत पदक कमावले होते.

**आयटीएफ सर्किट स्पर्धेत खेळताना अंकिताने तब्बल ११ एकेरीत तर १८ मिश्र दुहेरीत विजेतेपदे पटकावली आहेत. सन २०१८ मध्ये अंकिताने आशियाई स्पर्धेत कांस्य पदकाची कमाई केली. यापूर्वी केवळ भारताची टेनिसपटू सानिया मिर्झाने या स्पर्धेत पदक कमावले होते.**

त्याच वर्षी झालेल्या $25K स्पर्धेत विजेतेपद मिळवताना आंतर राष्ट्रीय रँकींगमध्ये १८१ वे स्थान पटकावले. सन २०२१ सालच्या फिलिप आयलंड चषक स्पर्धेत पहिली डब्यूटीए सिंगल सामन्यात विजेतेपद पटकावले. या लढतीत अंकिताने इटलीच्या एलिसाबेटा कोकियारेटोला पराभूत करताना इतिहासात नाव कोरले.